# प्रसिध्दीवृत्त

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार अर्ज भरण्यास दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ

सिंधुदुर्ग जिल्हयामधील **इ.११ वी व १२ वी तसेच इयत्ता ११ वी, व १२ वी नंतरच्या व्यावसायिक,बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील** जिल्हास्तरावरील तसेच तालुकास्तरावरील विद्यार्थ्यांकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणेविषयीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने https://hmas.mahait.org या पोर्टलवर भरण्याबाबत दि. ३१ डिसेंबर २०२५ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अटी व शर्ती याप्रमाणे आहे. विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील असावा, संदर महाविद्यालयातील इ.११वी, १२ वी तसेच ११ वी व १२ वी नंतरच्या व्यावसायिक ,बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित असावा.सदर विद्यार्थ्यास मागील अभ्यासक्रमास ५० टक्यापेक्षा जास्त गुण असावेत. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ही मर्यादा ४० टक्के इतकी राहील. ज्या तालुक्यांमध्ये मुला/मुलींचे शासकीय वसतिगृह आहेत त्या तालुक्यातील विदयार्थ्यांनी प्रथमत: वसतिगृहासाठी अर्ज करावा. जर वसतिगृहात प्रवेश मिळत नसेल तर स्वाधार योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना/शासकीय वसतिगृह योजना/विदयावेतन योजना या तीन योजनांपैकी एकाच योजनेचा लाभ घेता येईल.

तरी गरजू विदयार्थ्यांनी सन २०२४-२५ वर्षामध्ये स्वाधारसाठी नोंदणी केलेले विदयार्थी तसेच चालू वर्षात २०२५-२६ मध्ये प्रवेशित विदयार्थी स्वाधारसाठी अर्ज करू शकतात. ऑनलाईन भरणेत आलेल्या अर्जाची PDF व शैक्षणिक आवश्यक कागदपत्रांसह दि.०१.०१.२०२६ अखेर पर्यंत नजीकच्या मुलांचे/मुलींचे शासकीय वसतिगृह/महाविदयालय व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधुदुर्ग कार्यालय येथे समक्ष/टपालव्दारे परिपुर्ण अर्ज सादर करावेत.

संबंधित महाविदयालयांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेबाबत पात्र विदयार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेण्याबाबत आपल्या स्तरावरून सूचित करणेत यावे.

सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कार्यालय,सिंधुदुर्ग (०२३६२-२२८८८२) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,सिंधुदुर्ग श्री. संतोष चिकणे यांनी केले आहे.

19.12.25

**(तुषार गवळी)**
**विशेष अधिकारी (शानिशा)**
**समाजकल्याण सिंधुदुर्ग**

ADV. DATTA PATIL H. & COLLEGE * K.E.S. LOKHETE